सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले ▲ अंक : २० ▲ सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ ▲ पाने : ४ ▲ अमळनेर ▲ किंमत : १ रु. Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१३ ऑक्टोबर

- ग्रिनिच जवळून जाणारे रेखावृत्त हे शून्य मानून आंतरराष्ट्रीय मान्यता त्यानुसार सर्व जगाची वेळ निश्चित केली गेली.
- पुण्यातील पार्वती देवस्थान दलितांसाठी खुले करण्यात आले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# ही कसली लालपरी ? ? ? ही तर धारदार सुरी!

## अमळनेर आगारातील जीवघेण्या बसमुळे प्रवाशांच्या जीवाला धोका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

सामान्य जनतेची जीवनदायिनी मानली जाणारी राज्य परिवहन महामंडळाची बस अर्थात 'लालपरी' आज प्रवाशांच्या जीवावर उठल्याचे चित्र आहे. अनेक एसटी बसच्या दरवाजांवरील आणि खिडक्यांवरील पत्रे ढिले होऊन धारदार सुरीसारखी बाहेर आलेले आहेत. त्यामुळे प्रवासी सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी प्रवाशांकडून " ही कसली लालपरी ?, ही तर धारदार सुरी...! अशी उपरोधिक टीका होत आहे.

गेल्या काही दिवसांत तालुक्यात एसटी बस अपघातांची मालिका वाढली आहे. धावता धावता बंद पडणाऱ्या आणि ब्रेकडाऊन होणाऱ्या बसमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो आहे. शिवाय त्यामुळे अपघाताची शक्यताही निर्माण होत आहे. काही बसचे दरवाजे, सीट्स आणि खिडक्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे प्रवास त्रासदायक ठरत आहे. परिणामी एसटीवरील लोकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. अमळनेर बस स्थानकातून निघालेल्या एका लांब पल्ल्याच्या बसचा तर स्थानकापासून अवघ्या शंभर मीटरवरच 'ब्रेकडाऊन' झाला. बस रस्त्यावर बंद पडल्याने मागील वाहतूकही ठप्प झाली होती.

अमळनेर आगाराचे दररोज सुमारे ६ ते ७ लाख रुपये इतके सरासरी उत्पन्न आहे. सणासुदीच्या काळात यामध्ये वाढ होते. सध्या आगारात १० नवीन बस दाखल झाल्या आहेत. मात्र, जुन्या, जीर्ण व वारंवार बंद पडणाऱ्या बस अजूनही विविध मार्गांवर धावत आहेत. विशेषतः ग्रामीण भागात धावणाऱ्या बस रस्त्यावरच बंद पडण्याचे प्रमाण जास्त आहे. यामुळे शाळकरी विद्यार्थी, नोकरदार आणि महिला प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. वारंवार दुरुस्ती करूनही बस सकाळी मार्गावर निघताच बंद पडतात. यावरून देखभाल यंत्रणेतील निष्काळजीपणा उघड होत आहे.

या परिस्थितीकडे महामंडळाने तातडीने लक्ष देऊन जुन्या व धोकादायक बस रस्त्यावरून दुरुस्त कराव्यात, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

### अमळनेर आगार आकडेवारी

| | |
|---|---|
| एकूण बससंख्या | ७७ |
| चालक | १११ |
| वाहक | १२७ |
| इतर कर्मचारी | ४६ |



"सध्या काही भागांतील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. काही ठिकाणी सुरू असलेल्या कामकाजामुळे बसवरही परिणाम होतो. बसचे पत्रे किंवा इतर भाग नुकसान झाल्यास आम्ही त्वरित दुरुस्ती करून घेत असतो.

– पी. बी. चौधरी
आगार प्रमुख, अमळनेर.






(छायाचित्र : शरद कुलकर्णी)

# भरधाव डंपरचा एक्सल तुटल्याने चोपडा रस्त्यावर वाहतुकीचा खोळंबा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : चोपडा रस्त्यावर खडीने भरलेल्या डंपरचा एक्सल तुटल्याने डंपर बंद पडला होता. यामुळे वाहतुकीचा खोळंबा झाला होता. ही घटना रविवार, दि. १२ सकाळी अकराच्या सुमारास शनी मंदिराजवळ घडली. सुदैवाने, वाहनांमध्ये अंतर असल्याने कोणतीही दुर्घटना घडली नाही.

या घटनेनंतर भर रस्त्यात डंपर उभा राहिल्याने चोपडा दिशेने जाणाऱ्या वाहनांची वाहतूक विस्कळीत झाली. सुमारे अर्धा किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

अनेक वाहनांना रिव्हर्स घेऊन नाक्यापर्यंत मागे जावे लागले. यामुळे काही काळ वाहतूक वळविण्यात आली. पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. जेसीबी बोलावून त्या डंपरमधील खडी दुसऱ्या डंपरमध्ये भरून तो खाली करण्यात आला. त्यानंतर दुपारी तो डंपर दुरूस्ती करून रवाना करण्यात आला. दरम्यान, अमळनेर- चोपडा हा मुख्य रस्ता आहे.

मात्र, या रस्त्यावर मोठ- मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना त्रास होतो. या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी. अपघात टाळण्यात यावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# भारतात लिंग गुणोत्तरात सुधारणा; १००० पुरुषांमागे ९१७ मुलींचा जन्म

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात मुलींच्या जन्मदरात लक्षणीय वाढ झाल्याची नोंद झाली आहे. २०२१ ते २०२३ या कालावधीत दर १००० पुरुषांमागे ९१७ मुलींचा जन्म झाला. जे २०१६-१८ च्या तुलनेत १८ बिंदूंनी जास्त आहे. या कालावधीत मुलींचा जन्मदर ९८ ने वाढला आहे, अशी माहिती केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाच्या अतिरिक्त सचिव आराधना पटनायक यांनी दिली. ही सुधारणा भ्रूणहत्याविरोधी कायद्याच्या म्हणजेच प्रसूतीपूर्व आणि गर्भलिंग निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याच्या कठोर अंमलबजावणीमुळे शक्य झाली आहे.

**लिंग गुणोत्तरातील सकारात्मक बदल**

२०१६-१८ मध्ये १००० पुरुषांमागे ८९९ मुलींचा जन्म नोंदविला गेला होता. २०२१-२३ मध्ये हे प्रमाण ९१७ पर्यंत वाढले. यामुळे मुलींच्या जन्मदरात १८ बिंदूंची वाढ झाली आहे. भ्रूणहत्याविरोधी कायदा केवळ कायदेशीर साधन नसून, लिंग निवडीला प्रतिबंध करण्याचा सामाजिक आणि नैतिक उपाय आहे. आराधना पटनायक यांनी सांगितले, की मुलींची रोगप्रतिकारकशक्ती आणि जीवंत राहण्याची क्षमता नैसर्गिकरित्या मुलांपेक्षा जास्त असते. त्यामुळे लिंग निवडीच्या प्रथांवर बंदी घालण्यापेक्षा अशा घटना मुळात टाळण्यावर भर दिला पाहिजे. पालकांनी मुलगा किंवा मुलगी यापेक्षा बाळाच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे.

**नव्या तंत्रज्ञानाचे आव्हान**

सध्या नव्या तंत्रज्ञानाचा गैरवापर आणि ऑनलाइन माध्यमांद्वारे भ्रूणहत्याविरोधी कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात नुकत्याच झालेल्या बैठकीत डिजिटल इंटरमिडियारीज आणि कठोर अनुपालन यंत्रणेद्वारे नियंत्रण आणण्यावर चर्चा झाली. तंत्रज्ञानाच्या गैरवापरावर अंकुश लावण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृतीवर भर देण्याची गरज व्यक्त करण्यात आली. भारतातील लिंग गुणोत्तरातील ही सुधारणा समाजात सकारात्मक बदल घडविणारी आहे. भ्रूणहत्याविरोधी कायद्याच्या कठोर अंमलबजावणीमुळे मुलींच्या जन्मदरात वाढ झाली आहे. तरी तंत्रज्ञानाच्या गैरवापरामुळे नवे आव्हान उभे आहे. यासाठी सरकार, प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

# माजी आमदार शिरीषदादा चौधरी शिवसेनेत करणार प्रवेश

## स्पष्टीकरण : विकासासाठी घेतला निर्णय, स्वार्थासाठी नाही...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मी आजपर्यंत जनतेच्या विकासासाठी कार्य केले आहे. पत्रकार बांधवांनीही ते प्रामाणिकपणे जनतेपर्यंत पोहोचविले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून मी शिवसेना शिंदे गटात प्रवेशाच्या चर्चा होत्या. आता या चर्चांना पूर्णविराम देत आहोत. मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात मी अनेक कार्यकर्त्यांसह पक्षप्रवेश करणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांचेही मला सहकार्य लाभले आहे, अशी माहिती येथील माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी दिली. रविवार, दि. १२ रोजी दुपारी त्यांच्या येथील कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी माजी नगरसेवकांसह त्यांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री. चौधरी म्हणाले, की माझ्या प्रवेशाचा उद्देश केवळ राजकीय नाही. अमळनेरचा सर्वांगीण विकास साधणे हाच आहे. शहर आणि ग्रामीण भागात



विकासाची गंगा व्हावी, ही आमची भुमिका आहे. आगामी नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुका आम्ही शिवसेना शिंदे गटाच्या धनुष्यबाण या चिन्हावर लढवणार आहोत.

**गट वेगवेगळे नाहीत, सर्वांचा उद्देश विकास**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदामंत्री ना. गिरीशभाऊ महाजन यांच्याशी माझे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत व कायम राहतील. महायुतीचे गट वेगळे नाहीत. फक्त मी पहिल्या- दुसऱ्या रांगेतून आता तिसऱ्या रांगेत बसत आहे, एवढाच फरक आहे. उपमुख्यमंत्री शिंदे आणि मुख्यमंत्री फडणवीस हे एकाच विचारधारेचे नेते आहेत. स्थानिक शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच हा निर्णय आम्ही घेतला आहे. शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी आनंदी आहेत. ते माझ्या सोबत उभेही आहेत. यामुळे कोणाच्या नाराजीचे कारणच नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**राष्ट्रवादीत जे गेले त्यांना स्वातंत्र्य**

ज्यांनी- ज्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) प्रवेश घेतला हे त्यांचे व्यक्तिगत स्वातंत्र्य आहे. मात्र, माझ्यासोबत असलेला मित्रपरिवार, माजी नगरसेवक, सरपंच, सदस्य सगळे माझ्यासोबत आहेत. आम्ही सर्व मिळूनच मोठ्या संख्येने शिवसेनेत पक्षप्रवेश करणार आहोत.

**आमदार अनिलदादा पाटलांवर टीका**

अमळनेरमध्ये सद्यस्थितीत पाणीटंचाईची भीषण समस्या आहे. गुंडगिरीही वाढल्याचे दिसत आहे. विकास नाही, तर स्वार्थ हेच त्यांचे राजकारण

पान २ वर

# भुसावळ – उधना मेमो तांत्रिक कारणाने खोळंबली

## पाळधीजवळील घटना; २५० प्रवासी सुखरूप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भुसावळ- उधना मेमो ट्रेनमध्ये (क्रमांक १९१०६) तांत्रिक बिघाड झाल्याने पाळधी रेल्वे स्थानकावर थांबवण्यात आली आहे. ही घटना शनिवार, दि. ११ रात्री पावणेबाराच्या सुमारास घडली. दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून, लवकरच ही ट्रेन मार्गी लागेल, अशी माहिती रेल्वेच्या सूत्रांनी दिली आहे.

भुसावळ- उधना मेमोच्या ड्रायव्हिंग मोटर कोचच्या (डीएमसी क्रमांक २००४३) मागील ट्रॉलीच्या उजव्या बाजूस हॉट ॲक्सेलमध्ये (अतिउष्ण चाकाचा भाग) तांत्रिक बिघाड झाला. यामुळे ही मेमो ट्रेन रात्री ११ : ४५ वाजता पाळधी स्टेशनच्या एका रुळावर थांबविण्यात आली. घटनेची माहिती मिळताच अमळनेर पोस्टचे उपनिरीक्षक खेलसिंग, सहाय्यक उपनिरीक्षक जयपालसिंग आणि कॉन्स्टेबल अर्जुनसिंग यांनी तातडीने



पाळधी स्टेशनवर धाव घेतली. मेमो ट्रेनमध्ये सुमारे २५० प्रवासी होते. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रवाशांना गाडी (क्रमांक १२९०६) शालीमार- पोरबंदर एक्सप्रेसमध्ये बसविण्यात आले. यातून त्यांना उधना येथे रवाना करण्यात आले. प्राथमिक चौकशीत केवळ तांत्रिक कारणामुळे गाडी थांबविण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. घटनेचा संयुक्त पाहणी अहवाल वाहतूक निरीक्षक (अमळनेर), उपनिरीक्षक रेल्वे सुरक्षा बल अमळनेर, ऑन ड्युटी गाडी व्यवस्थापक रवींद्र टी. शिंदे (मुख्यालय नंदुरबार) व मोटरमॅन अनिल वसईकर (मुख्यालय नंदुरबार) यांच्या उपस्थितीत तयार करण्यात आला.

# जळोद- बुधगाव पुलाला वाळू उपशाचा धोका!

## कारवाईबाबत आनंदी आनंद; दुर्घटना झाली तर जबाबदार कोण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र व मध्य प्रदेश सीमेला जोडणाऱ्या तापी नदीवरील जळोद- बुधगाव पुलाला वाळूच्या अवैध उपशामुळे गंभीर धोका निर्माण झाला आहे. पुलाच्या पायाखाली मोठ- मोठेक खोल खड्डे तयार झाले आहेत. पुलाच्या स्थैर्यावर संकट असताना संबंधित विभागाने डोळेझाक का करत आहे? दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का ? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

तापी नदीपात्रातून दररोज रात्री मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू आहे. बेकायदेशीर वाळू वाहतूक डंपरमधून राजरोसपणे सुरू आहे. महसूल




विभाग आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनी मौन बाळगले आहे. वाळूमाफियांचे मनोबल दिवसेंदिवस वाढत आहे. या अनधिकृत उपश्यामुळे पुलाखाली पोकळी निर्माण झाली आहे. पायाभूत संरचनेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या वारंवार तक्रारी असूनही कारवाईचा 'केवळ कागदी दिखावा आहे. बाकी सर्व आनंदी आनंद आहे,' अशी ग्रामस्थांची तक्रार आहे.

स्थानिक प्रशासन ठराविकच वाहनांवर थातूरमातूर कारवाई करते. " शासकीय कामे सुरू आहेत. त्यासाठी वाळू लागते आहे,'' असे जबाबदार लोकांकडून बेजबाबदारपणे सांगण्यात येत असल्याचेही ग्रामस्थ म्हणतात. दररोज शेकडो ब्रास वाळूने भरलेल्या ट्रकने वाहतूक होत आहे. महसूल आणि पोलीस विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या संगनमताशिवाय हे सारे काही बिनबोभाटपणे सुरू राहणे शक्यच नाही, असा आरोप होत आहे. प्रशासनाच्या या निष्क्रियतेमुळे पुलाच्या पायाजवळ निर्माण झालेले खड्डे दिवसेंदिवस खोल होत आहेत. कुठल्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामस्थांनी थेट पुल कोसळण्याची भीती व्यक्त केली आहे.







## शिरीषदादा चौधरी शिवसेनेत करणार प्रवेश

.पान १ वरून

आहे. ते दोन नंबरचे धंदे थांबविण्याची भाषा करतात. मग वाळू माफियांचे काय?

**पक्षाचा निर्णय आम्हाला मान्य**

महायुती संदर्भात श्री. चौधरी म्हणाले, पक्ष जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य असेल. परिस्थितीनुसार पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील आणि नेते मार्ग ठरवतील.

**साहेबरावदादा पाटील देखील येणार?**

श्री. चौधरी म्हणाले, की माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनी ना. गुलाबराव पाटील यांना भेटून शिवसेनेत प्रवेश करण्याचे संकेत दिले आहेत. जर ते आले तर आम्ही दोघे एकाच बोनेटवर बसून पक्षप्रवेश करू हे सोन्याहून पिवळं ठरेल. (याबाबतच्या खुलाशासाठी कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.)

**मागासवर्गीयांच्या आरक्षणाला विरोध नको**

नगरपालिका आरक्षणाविषयी बोलताना श्री. चौधरी म्हणाले, की भारत देश समानतेचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येकाला मतदानाचा आणि नेतृत्वाचा अधिकार दिला आहे. जो या निर्णयाच्या विरोधात कोर्टात गेला आहे, तो प्रत्यक्षात त्या समाजाच्या विरोधात गेला आहे, असाच अर्थ होईल. दलित, आदिवासी, गोरगरीब यांच्या हातात सत्ता जाणे आवश्यक आहे. मागासवर्गीयांच्या आरक्षणाला विरोध नको. विकेंद्रीकरण हे लोकशाहीचे सौंदर्य आहे. एकंदरित, श्री. चौधरी यांच्या शिवसेना प्रवेशाच्या घोषणेने शहर व तालुक्याचे एकूणच राजकारण आता कोणत्या मार्गावर जाते ? त्याचे परिणाम व पडसाद काय असतील ? तळ्यात- मळ्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांची कोंडी होते की ते उघड डेअरिंग करतील, हे नजिकच्या काळात स्पष्ट होईल.

## गुन्हेगार व त्यांची लाइफस्टाइल

### चार्ल्स शोभराज

- **जन्म व वंश :** ६ एप्रिल १९४४, जम्मू, भारत, फ्रेंच आणि व्हिएतनामी वंश.
- **गुन्हेगारी शैली :** १९७० च्या दशकात भारत, थायलंड, नेपाळ, फ्रान्समध्ये परदेशी पर्यटकांचा शिकार. लोकांना विषारी औषधे, ड्रग्ज किंवा फसवणूक करून मारणे. पोलिसांना गोंधळात टाकण्यासाठी आकर्षक, शालीन व्यक्तिमत्त्व दाखविणे
- **लाइफस्टाइल :** जगभर फिरणे, हॉटेल्समध्ये राहणे, छुप्या संपर्कातून पैसा कमावणे. जेलमध्ये असताना स्वतःचा इतिहास लिहिला. छायाचित्रे गोळा केली.
- **विशेष तथ्य :** शत्रूपेक्षा शहाणा; गुन्ह्यांसाठी meticulously योजना करणे. काहींना त्याची बुद्धिमत्ता आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व ‘ fascinating ’ वाटले.

# हरफन मौला गायक : किशोरकुमार



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

स्वभावाने विक्षिप्त असलेला माणूस परप्रांतातून वडील भावाच्या पावलांवर पाऊल ठेवून मुंबई नगरीत येतो काय? अन् संगीताचे विशेष असे शिक्षण न घेता स्वकर्तृत्वाने मायानगरी काबीज करतो काय? याला देखील निसर्गाचा विक्षिप्तपणाच म्हणावा काय? हा विक्षीप्त, लहरी, उत्तम, नकलाकार व हरफन मौला म्हणजे गायक किशोरकुमार. आज १३ ऑक्टोबर रोजी त्यांची ३८ वी पुण्यतिथी. त्यानिमित्ताने...

किशोरकुमार यांचे पूर्ण नाव आभासकुमार कुंजलाल गांगुली. जन्म खंडवा (मध्य प्रदेश) येथे ४ ऑगस्ट १९२९ मध्ये झाला. हे वर्ष आम्हा सर्व संगीतप्रेमींसाठी एक पर्वणीच होती. कारण याच वर्षी पुढील महिन्यात म्हणजे २८ सप्टेंबर १९२९ रोजी गानसम्राज्ञी व भारतरत्न लतादीदींचा जन्म झाला.

किशोरदांचे वडील व्यवसायाने वकील होते. कुंजलाल व गौरी (आई) यांना एकूण ४ अपत्ये होते. ३ मुले व एक मुलगी. कुमुद, कल्याण व आभास ही ३ मुले, तर मुलीचे नाव सती राणी होते. मात्र या तिन्ही मुलांची नावे नंतर बदलण्यात आली. ती अशी - मोठा अशोककुमार, मधला अनुपकुमार, तर लहान किशोरकुमार. बहीण सती राणीने प्रसिद्ध चित्रपट निर्माता शशधर मुखर्जीसोबत लग्न केले. त्याकाळची आघाडीची नायिका, तनुजा (काजोलची आई) ही नंतर त्यांची सून झाली.

किशोरदांसह त्याकाळचे सर्व गायक आपापल्या शैलीत माहीर होते. उदा.- लता, आशा, रफी, मन्ना-डे तलत, मुकेश इत्यादी पण किशोरदा आपल्या लहरी स्वभावामुळे कौटुंबिक व आर्थिक अडचणींमुळे मागे पडले होते.

त्यांनी उमेदवारीच्या काळात संगीतकार सरस्वतीदेवीच्या मार्गदर्शनाखाली कोरसमधून गाऊन, पार्श्वगायनाचा श्रीगणेशा केला. तू प्रतिसैगल होशील, असा आशीर्वाद संगीतकार खेमचंद प्रकाश यांनी त्यांना दिला होता. नंतर ते संगीतकार सचिनदेव बर्मन यांच्या सहवासात पार्श्वगायक म्हणून विकसित होत गेले.

खेमचंद प्रकाश या संगीतकाराकडे किशोरदा पहिले सैगल स्टाईलचे ‘जगमग जगमग करता निकला’ हे गीत गायिले. त्या काळी पुरुष सैगल स्टाईल, तर स्त्री गायिका नूरजहाँ टाईप गात असे. पण किशोरदा मात्र दुसरा सैगल न होता अद्वितीय किशोरकुमारच राहिले.

१९५६ मध्ये प्रथम पत्नी रोमादेवी व मुलगा अमितकुमारचे दूर जाणे, द्वितीय पत्नी मधुबालाचे दीर्घ आजाराने निधनानंतर (याच मधुबालासाठी किशोरदाने मुस्लीम धर्म स्वीकारला होता.) योगिता बाली (अभिनेत्री) सोबत ४ ऑगस्ट १९७५ रोजी विवाह करून देखील ते आनंदी व समाधानी नव्हते. यावेळी त्यांनी हिदू धर्म स्वीकारला होता. नंतर योगिता बालीचा दुरावा, हे सगळे सहन केल्यामुळेच त्यांच्या स्वरात हृदयाच्या आतवर रुतून बसण्यासारखा दर्द होता. उदा.- ये क्या हुआ, कैसे कहे हम, पंथी हूं मै उस पथका, ये लाल रंग, चिंगारी कोई भडके, दिल आज शायर हैं इत्यादी गाण्यांतून त्यांनी आपल्या भावनांना व दुःखाला वाट मोकळी करून दिल्याचे जाणवते. तरी देखील ते प्रसन्न व हसतमुख राहत असत. नंतर काही कालावधी गेल्यानंतर त्यांनीच निर्माण केलेल्या ‘ प्यार अजनबी है ’ (जो रिलीज झाला नाही) चित्रपटात लीना चंदावरकरला घेतले. १९८२ मध्ये शूटिंगदरम्यान हे दोघे जवळ आले. त्यांचे प्रेम जमले व नंतर ते विवाहबद्ध झाले.

साधारणतः दोन वर्षांत त्यांना एक मुलगा झाला. त्याचे नाव सुमीत. अमीतकुमारला भाऊ मिळाला, तर सुमीतमुळे कुटुंब आणखी जवळ आले. किशोरदा आता खरे आर्थिक, कौटुंबिक व मानसिकरित्या स्थिरावले होते. किशोरदांनी प्रत्येक नायकाला प्रसंगानुरूप आवाज दिला. त्यांच्या गाण्यात सहजता होती. या सोनपुतळ्याची ओळख सिनेसृष्टीला फार उशिरा झाली. मॉडेलिंगमुळे तर किशोरदांचे वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. त्यांचा वापर संगीतकारांनी अत्यंत सुंदररित्या करून ती गाणी अमर केली. उदा.- मै हू झुमरू (झुमरू), जिंदगी एक सफर हैं सुहाना (अंदाज), तुम बिन जाऊ कहा (प्यार का मौसम) वगैरे.

ते फक्त गायिलेच नाही, तर सिनेमातील पडद्यामागील अनेक भूमिका देखील त्यांनी अत्यंत यशस्वीरित्या निभावल्या. उदा.- संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, संकलक इत्यादी तसेच अभिनेता म्हणून त्यावेळच्या अनेक यशस्वी अभिनेत्रींबरोबर चित्रपट गाजले. उदा.- मीनाकुमारी (नया अंदाज), मधुबाला (चलती का नाम गाडी), वैजयंतीमाला (लडकी), उषाकिरण (धोबी डॉक्टर), नूतन (दिल्ली का ठग) याशिवाय माला सिन्हा, वहिदा रेहमान, साधना, तनुजा व नंतरची मुमताज देखील त्यांच्या नायिका होती.

किशोरदा फक्त ५८ वर्षांचे आयुष्य जगले. त्यांच्या संपूर्ण कारकीर्दीत त्यांनी शिकारी (१९४६) ते दूर का राही (१९७१) अशा एकूण ९३ चित्रपटांत अभिनय केला. एकूण २० चित्रपट निर्माण केले. त्यांनी एकूण २९०५ (यात गैरफिल्मी व प्रादेशिक गितांचाही समावेश आहे.) गाणी म्हटली. पैकी ११३५ गाणी सोलो आहेत. आर. डी.कडे सर्वाधिक म्हणजे ५८८ गाणी गायिले, लतादीदींसोबत ३४३ गाणी म्हटली, तर आशा भोसलेंसोबत ६८९ द्वंद्वगीते म्हटली. इतर कोणत्याही गायिकेसोबत एवढी गाणी म्हटली नाहीत. प्रत्येक निर्माता आपल्या चित्रपटात किशोरदांचे एक गाणे हवे, यासाठी आग्रही असायचा. तो हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, कन्नड, भोजपुरी व इतर भाषांमध्येही गायिला. कारण त्यांच्या आवाजात असलेला खट्याळपणा, रोमांस व दर्द यांचे मिश्रण.

८ वेळा उत्कृष्ट गायक म्हणून फिल्मफेअर पुरस्कार मिळविणारा आजपर्यंत तो एकमेव पुरुष गायक आहे. याच किशोरदांनी ‘ आराधना ’पासून रफीला अडगळीत टाकला होता. नंतर मात्र ते मरेस्तोवर गात राहिले. त्यांचे शेवटचे सोलो गाणे ‘ तुम ही तो हो ’, हे १० ऑक्टोबर १९८७ रोजी रेकॉर्ड केले होते. आमच्या मनात, विचारात, कानात, घरात, कट्ट्यावर आणि सर्वत्र किशोरदांचाच आवाज निनादत असतो.

किशोरदा आता मात्र तुम्ही गेल्यापासून आम्हाला संगळे बेसूर व बेताल वाटतेय. या दुर्दैवाच्या फेऱ्यातून बाहेर पडण्यासाठी आम्ही एक करणार आहोत. घरातील गरजेच्या वस्तू संपल्या तरी चालतील पण तुझ्या गाण्यांच्या जमावटीला खंड पडू देणार नाही.

अशा या ‘ हरफन मौला ’ बहुआयामी गायिकाला निवृत्त होऊन खंडव्याला उर्वरित आयुष्य व्यतित करायचे होते. पण ही इच्छा पूर्ण होण्याआधीच १३ ऑक्टोबर १९८७ ला आकस्मिक निधन झाले.

किशोरदांच्या मृत्यूला ३८ वर्षे झाली. पण त्यांची जागा आजच्या काळातील कोणताही गायक वा अभिनेता भरून काढू शकणार नाही. किशोर ते किशोरच! तुमच्या जाण्याचे दुःख जरूर आहे. पण घाई निश्चित झाली. म्हणूनच तर जाताना देखील तुमच्या गळ्यात या ओळी अडखळल्या असतीलच.तेरी दुनियासे होके मजबूर चला, मैं बहोत दूर, बहोत दूर चला!

### किशोरदांची आवडती (गायिलेली) १० गाणी

१) दुःखी मन मेरे - फंटुश (१९५६) एस. डी. बर्मन
२) जगमग जगमग करता - रिमझिम (१९४९) खेमचंद प्रकाश
३) हुस्न भी उदास उदास - फरेब (१९५३) अनिल विश्वास
४) चिंगारी कोई भडके - अमरप्रेम (१९७१)आर. डी. बर्मन
५) मेरे नैना सावन भादो - मेहबूबा (१९७६)आर. डी. बर्मन
६) कोई हमदम न रहा - झुमरू (१९६१) किशोरकुमार
७) मेरे मेहबूब कयामत होगी - मि. एक्स इन बॉम्बे - लक्ष्मी-प्यारे (१९६४)
८) कोई होता जिसको अपना - मेरे अपने (१९७१) - सलील चौधरी
९) वो शाम कुछ अजीब थी - खामोशी (१९६९) - हेमंत कुमार
१०) बडी सुनी सुनी हैं - मिली (१९७५)

- शरद सोनवणे
मो. : ९४२०१ ०८३०५

# ९ रुपये पेन्शनसाठी नवाबांचे वंशज हजारो रुपये खर्च करून का येतात?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अवधच्या नवाबांचा इतिहास भारताच्या सांस्कृतिक आणि राजकीय वारशाचा अविभाज्य भाग आहे. ब्रिटिश काळात अवधच्या नवाबांनी ईस्ट इंडिया कंपनीला मोठ्या रकमेचे कर्ज दिले होते. या कर्जाच्या व्याजातून त्यांच्या वंशजांना आजही ‘ वसीका ’ नावाने पेन्शन मिळते. ही रक्कम आता इतकी कमी झाली आहे, की ती घेण्यासाठी लखनौतील वसीका कार्यालयात येण्याचा खर्च त्यापेक्षा कितीतरी जास्त आहे. तरीही नवाबांचे वंशज दरवर्षी हजारो रुपये खर्च करून ही प्रतीकात्मक रक्कम घेण्यासाठी हजर होतात. यामागचे कारण आहे त्यांचा राजसी वारसा आणि अभिमान.

**वसीकेची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

१८१७ मध्ये अवधचे नवाब शुजा-उद-दौला यांच्या पत्नी बहू बेगम यांनी ईस्ट इंडिया कंपनीला ४० दशलक्ष रुपयांचे कर्ज दिले होते. या कर्जाच्या व्याजातून त्यांच्या कुटुंबीयांना आणि सहकाऱ्यांना मासिक पेन्शन मिळण्याची अट होती. ब्रिटिशांनी १८५६ मध्ये अवधवर कब्जा केल्यानंतरही ही पेन्शन सुरू राहिली. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने ती कायम ठेवली. सुरूवातीला ही रक्कम मोठी होती. परंतु वंशजांची संख्या वाढत गेल्याने ती विभागली गेली. उदा.- एखाद्या व्यक्तीला १०० रुपये मिळत असतील, तर त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या दोन वारसांना प्रत्येकी ५० रुपये मिळतात. आज काही वंशजांना फक्त ९ रुपये किंवा त्यापेक्षा कमी रक्कम मिळते.

**अभिमान आणि परंपरेची जोड**

लखनऊतील हुसैनाबाद ट्रस्टमार्फत ही पेन्शन वितरित केली जाते. एका वंशजाने सांगितले, की ही पेन्शन आमच्या राजसी वारशाची ओळख आहे. आम्ही कितीही खर्च करून ती घ्यायला येतो. काही वंशज राजसी थाटात, गाड्यांमधून कार्यालयात येतात. ही १८० वर्षांहून अधिक काळ चालत आलेली परंपरा जपतात. त्यांच्यासाठी ही रक्कम आर्थिक मूल्यापेक्षा जास्त भावनिक आणि ऐतिहासिक महत्त्वाची आहे.

**कमी रक्कम, तरीही मागणी**

२०१० मध्ये सरकारने ही पेन्शन किंचित वाढविली होती. ज्यामुळे २५८ वंशजांना लाभ झाला. काहींना ३,००० रुपये, तर काहींना फक्त १०.५० रुपये मिळाले. तरीही वंशज व्याजदर अद्ययावत करण्याची मागणी करतात. एका तरुण वंशजाने म्हटले, ‘५०० रुपये पेट्रोलवर खर्च करून ९ रुपये घेणे विचित्र वाटते. परंतु हा आमच्या इतिहासाशी जोडलेला धागा आहे. अवधच्या नवाबांच्या वंशजांसाठी ही ९ रुपयांची पेन्शन केवळ पैसा नाही, तर त्यांच्या राजसी वारशाची आणि इतिहासाची साक्ष आहे. कितीही खर्च झाला तरी ते ही परंपरा जपतात. कारण त्यांच्यासाठी अभिमान आणि ओळख आर्थिक मूल्यापेक्षा मोठी आहे.

# यशस्वी जयस्वाल, भारतीय क्रिकेटपटू

## क्रिकेटसाठी घराबाहेर पळून गेला, तंबूत अनेक रात्री घालवल्या; आता टीम इंडियाचा उगवता तारा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

यशस्वी जयस्वाल (वय २३) भारतीय क्रिकेट संघातील एक उदयोन्मुख स्टार आहे. अलीकडेच एका मासिकाने त्यांचा जगभरातील १०० उदयोन्मुख स्टार आहे. अलीकडे संबंधित मासिकाने त्यांचा जगभरातीस १०० उदयोन्मुख स्टार्सच्या यादीत समावेश केला आहे. या यादीत समावेश होणारे ते एकमेव भारतीय आहेत. त्यांच्या आयुष्यात अनेक चढउतार आले आहेत. चला यशस्वीच्या संघर्ष आणि यशाची कहाणी जाणून घेऊया...

यशस्वी जयस्वाल क्रिकेट खेळण्यासाठी घराबाहेर पडला तेव्हा तो दहा वर्षांचा असावा. तेथील अडचणी इतक्या गंभीर होत्या, की त्याची आई त्याला वारंवार घरी परत येण्यास सांगत असे. मात्र जयस्वाल तिला सांगत असे, की जर तो मैदानावर राहिला तर ते सोपे होईल. सकाळी उठल्याबरोबर तो क्रिकेट पाहत असे. संघर्ष : दुध शाळेत काम केले, पाणीपुरीही विकली यशस्वी जेव्हा मुंबईत आला तेव्हा त्याच्याकडे राहण्यासाठी जागा नव्हती. तो एका दुधशाळेत काम करत होता. त्या बदल्यात राहण्याची जागा मिळाली. तेथून काढून टाकल्यानंतर तो आझाद मैदानावरील तंबूत राहू लागला. त्याला अनेकदा माळीने फटकारले आणि तंबू रिकामा करण्यास सांगितले जात असे. इतकेच नव्हे, तर यशस्वीने खर्च भागविण्यासाठी पाणीपुरीही विकली. दरम्यान, यशस्वीची क्रिकेट प्रतिभा पाहून प्रशिक्षक ज्वाला सिंग यांनी त्याला प्रशिक्षण दिले. यशस्वीने २०१८-१९ मध्ये रणजी खेळायला सुरूवात केली. पण covid-१९ नंतर, जेव्हा सर्व काही बंद झाले तेव्हा यशस्वीला वाटले, की तो कधीही भारतासाठी खेळू शकणार नाही. यश : कसोटी पदार्पणात शतक, आयपीएलमध्ये मिळाले १८ कोटी २०१८ च्या १९ वर्षाखालील आशिया कपमध्ये यशस्वीने शानदार कामगिरी केली. त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. २०२३ मध्ये त्याने वेस्ट इंडिज विरुद्धच्या कसोटी पदार्पणात १७१ धावा केल्या. २०२४ मध्ये त्याने इंग्लंड विरुद्ध सलग दुहेरी शतक झळकावून इतिहास रचला. त्याची कसोटी सरासरी 50.20 आहे. आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सने २०२० मध्ये यशस्वीला २.४ कोटींना विकत घेतले २०२३ च्या आयपीएल हंगामात त्याच्या प्रभावी कामगिरीने त्याने ६२५ धावा केल्या. इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीझन पुरस्कार जिंकला. त्याच वर्षी यशस्वीला राजस्थान रॉयल्सने १८ कोटी रुपयांना कायम ठेवले. तो बुष्ट जेबीएल इंडिया व फायबर बोल्ड सारख्या ब्रँडशी संबंधित आहे.



# फळे, भाज्या सुकविण्यातून लाखोंची कमाई!

**सक्सेस स्टोरी** जळगावच्या वंदनाताई पाटील यांचा ब्रँड आता सातासमुद्रापार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

महाराष्ट्रातील जळगाव येथील श्रीमती वंदनाताई प्रभाकर पाटील यांनी वयाच्या ४५ व्या वर्षी फळे व भाज्या सुकविण्याचा व्यवसाय सुरू केला. त्यात त्यांनी अपार मेहनत, जिद्द, प्रामाणिकता आणि गुणवत्ता जपली. त्यामुळे त्यांच्याकडून यशाचा नवा अध्याय लिहिला गेला आहे. आजमितीस त्यांच्या गायत्री फूड्स ब्रँडच्या उत्पादनांना देशभरातच नव्हे; तर अमेरिका, कॅनडा आणि मालदीवसारख्या देशांमध्येही मागणी आहे. दोन दशकांहून अधिक काळ स्वयंसहाय्यता गटांसोबत काम केल्यानंतर त्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसायाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले. यात त्यांना प्रधानमंत्री फॉर्मलायझेशन ऑफ मायक्रो फूड प्रोसेसिंग एंटरप्रायझेस (PMFME) योजनेचाही आधार मिळाला आहे.

**कर्ज आणि सबसिडीने सुरू केला व्यवसाय**

प्रशिक्षणानंतर श्रीमती वंदनाताई यांनी व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. बँकेने त्यांचे व्यावसायिक कर्ज नाकारले. मात्र त्यांनी हार न मानता १० लाख रुपये वैयक्तिक कर्ज घेतले. PMFME योजनेंतर्गत त्यांना एक लाख ८१ हजार रुपये सबसिडी मिळाली. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांचे युनिट पूर्णपणे कार्यान्वित झाले. त्यांनी गायत्री फूड्स या ब्रँड नावाने उत्पादन सुरू केले.

**सौर निर्जलीकरण तंत्र :** युनिटची खासीयत

श्रीमती वंदनाताई यांचे युनिट पॉलीकार्बोनेट शीटपासून बनविलेल्या बोगद्यासारख्या संरचनेत कार्यरत आहे. हे युनिट सूर्यप्रकाशाच्या मदतीने ग्रीनहाऊससारखा परिणाम निर्माण करते. गरम हवा ट्रेमध्ये ठेवलेल्या भाज्यांना सुकवते. एक्झॉस्ट पंखे आर्द्रता बाहेर काढतात. यामुळे मोरिंगा, कढीपत्ता, बीट, टोमॅटो, कांदा आणि लिंबू यांसारख्या भाज्या आणि फळांचा नैसर्गिक रंग आणि गुणवत्ता टिकून राहते. यापासून तयार होणारे पावडर आणि फ्लेक्स ‘ ब्रेकफास्ट फूड्स ’ श्रेणीत मोडतात.

**बाजारपेठेतील मागणी आणि कमाई**

भारतात निर्जलित फळे आणि भाज्यांचा बाजार २०२३ मध्ये १७ हजार २०० कोटी रुपयांचा होता आणि २०२५ पर्यंत तो ३७ हजार कोटींहून अधिक होण्याचा अंदाज आहे. वाढती आरोग्य जागरूकता आणि सोप्या खाद्य पर्यायांची मागणी यामुळे हे क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. श्रीमती वंदनाताई यांचे गायत्री फूड्स देशभरात आणि अमेरिका, कॅनडा, मालदीव येथे उत्पादने पुरविते.

### उत्पादन आणि किंमत

- २२ किलो ताज्या टोमॅटोपासून १ किलो पावडर तयार होते. ज्याची किंमत ७०० रुपये किलो आहे.
- १० किलो बीटपासून २.५-३ किलो फ्लेक्स तयार होते. ज्याची किंमत ७०० रुपये किलो आहे.
- ४ किलो मोरिंगा किंवा कढीपत्त्यापासून १ किलो पावडर तयार होते.

कमाई :
- मासिक उलाढाल सरासरी ३ लाख रुपये.
- प्रदर्शनांमध्ये २-३ दिवसांत ८-१० लाख रुपयांची विक्री.



**टर्निंग पॉइंट : कृषी विज्ञान केंद्राची भेट**

श्रीमती वंदनाताई यांनी जळगावात स्वयंसहाय्यता गटांमार्फत (SHGs) लोणची, स्नॅक्स आणि मसाले बनवून विकले. मर्यादित मागणी आणि तीव्र स्पर्धेमुळे त्यांना नवीन दिशा हवी होती. त्यासाठी त्यांनी २०२१ मध्ये ममुराबाद (ता. जळगाव) येथील कृषी विज्ञान केंद्राला भेट दिली. तेथे श्रीमती वंदनाताई सौर निर्जलीकरण तंत्रज्ञान शिकल्या. या तंत्रज्ञानाने उत्पादनांची शेल्फ लाइफ वाढते, वजन कमी होते आणि पोषक तत्त्वे टिकून राहतात. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी किमतीत माल विकण्यापासून स्वतःला वाचविता येते, हे त्यांना समजले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# बोहरा येथील उपसरपंच प्रकाश पाटलांचा प्रामाणिकपणा

## रस्त्यावर सापडलेली बॅग मालकास परत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील बोहरा येथील रहिवासी प्रकाश ओंकार पाटील यांना रस्त्यावर एक कागदपत्रांची बॅग सापडली होती. ही बॅग त्यांनी मालकाचा शोध घेऊन परत केली आहे. त्यांच्या प्रामाणिकपणाचे तालुक्यात कौतुक होत आहे.

बोहरा येथील माजी उपसरपंच प्रकाश ओंकार पाटील हे सोनगिरहून परत येत होते. त्यांना अजंदे-वालखेडा गावादरम्यान रस्त्यावर कागदपत्रांनी भरलेली एक बॅग आढळून आली. त्यांनी बॅग घेऊन मारवड येथे येऊन पत्रकार डॉ. विलास पाटील यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर ती बॅग मारवड पोलिस ठाण्यात जमा केली. बॅगेत असलेल्या कागदपत्रांवरून मुळ मालकाला त्यांनी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला. सोनगिर येथील दिनेश सुरेश देवरे यांची ही बॅग असल्याचे निष्पन्न झाले. दिनेश देवरे यांनी मारवड पोलीस ठाणे गाठून ती बॅग ताब्यात घेतली. बॅगमध्ये त्यांचे आधारकार्ड, पॅन कार्ड, महत्त्वाची दस्तावेज व इतर मूळ कागदपत्रे होती. श्री. देवरे यांनी प्रकाश ओंकार पाटील यांचे आभार मानले. बॅग परत मिळाल्याने मारवड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक जीभाऊ पाटील यांनी प्रकाश पाटील यांचा विशेष सत्कार केला. यावेळी पत्रकार डॉ. विलास पाटील, हवालदार संजय सूर्यवंशी, दिनेश देवरे आदी उपस्थित होते.



(छायाचित्र : भरत पाटील)

# अहो, हा उड्डाणपूल आहे, की खड्ड्यांचा पूल आहे?

## प्रताप महाविद्यालयाजवळील उड्डाणपुलाकडे कोणीतरी लक्ष द्या हो जरा...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रताप महाविद्यालयाजवळील रेल्वे उड्डाणपुलावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनधारक आणि पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. विशेषतः शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा खूप त्रास होतो आहे. या उड्डाणपुलावरील खड्डे त्वरीत बुजवावेत आणि सदर पुलाचे दर्जेदार पद्धतीने दीर्घकाळ टिकेल, असे दुरुस्तीकरण करावे, अशी वयापक मागणी होत आहे.

सदर उड्डाणपुलावरून पुढे धार, मारवड, कळमसरे, निम, पाडळसरे, कपिलेश्वर आदी गावांकडे दररोज शेकडोहून अधिक छोटी, मोठी वाहने वापरतात. गेल्या काही दिवसांपासून या उड्डाणपुलावर खड्ड्यांचे प्रमाण खूप वाढले आहे. रस्त्यावरील डांबरही निघून खडी जणू या रस्त्याचे सत्यस्वरूप दाखवत बाहेर निघत आहे.

पावसाळ्यात सदर उड्डाणपुलावरून जाणे एकप्रकारची शिक्षाच असते. सायकलस्वार व मोटारसायकलस्वारांना याचा सर्वाधिक त्रास होतो. सदर पूल दर्जेदार पद्धतीने व दीर्घकाळ टिकेल अशी वारंवार मागणी होत आहे. मात्र, त्याबाबत अद्याप तरी कोणीही लक्ष दिलेले दिसत नाही.

# पालिका निवडणुकीसाठी बॅनरबाजीची स्पर्धा

## लेकीन यह पब्लिक है..सब जानती है...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आगामी पालिका निवडणुकीसाठी नगराध्यक्षपदाचे आणि प्रभागांचे आरक्षण जाहीर झाले आहे. यामुळे नेते, पदधिकारी, इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्ते प्रचार कामाला लागले आहेत. सोशल मीडियावर बॅनर, शुभेच्छा संदेश आणि प्रचार फलकांचा बोलबाला सुरू झाला आहे. बॅनर झळकतात, फोटोही बदलतात. मात्र, रस्ते, पाणी व स्वच्छता आदी विकास कधी होणार? हा प्रश्न नेहमीच अनुत्तरीच राहातो.




सोशल मीडियाच्या विविध साईट्स जसे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सॲप अशा माध्यमांवर जनतेचा नेता, विकासाची हमी, जनसेवेचा संकल्प, बस मी तुमचाच, तुम्ही माझेच, जनसेवा हीच ईश्वरसेवा, विकासकामांच्या अनुशेषासाठी कटिबद्ध, वॉर्डाचा चेहरामोहरा बदलवणार, शहराचा पूर्णतः कायापालट करणार, मला मत म्हणजे विकासाची हमी अशी घोषवाक्ये झळकताना दिसत आहेत. बॅनरवर अनेक सावळ्या रंगाचे व चेहरा लाइनदोऱ्यात नसतानाही गोरे व सुंदर दिसू लागले आहेत. (यांनी झटपट रुप बदलणारे कोणते क्रीम लावणे सुरू केले आहे, किंवा ते कोणत्या भारी पार्लरमध्ये जातात असा प्रश्न? मतदारांमध्ये उपस्थित होत आहे) दरम्यान काहींचे बॅनर व घोषवाक्य अतिरंजित व हास्यास्पद आहेत. काहींना मतदारांनी यापूर्वीही नगरसेवकपदाची संधी दिलेली होती. मात्र, त्यांच्याकडून ना विकासाची कामे झाली, ना लोकांच्या सुखःदुखात ते उपयोगी आले. अशा उमदेवारांची नवी भाषा व नवी वचने याला मतदार मुळीच किंमत देत नसल्याचे दिसत आहे. काहींना असे वाटते, की भरपूर प्रचार व भरपूर बॅनरबाजी आणि सोशल मीडियाचा उदंड वापर करून आपण हमखास निवडून येऊ. मात्र, आता मतदार सुजाण झालेले आहेत. (दूर्दैवाने काही ठिकाणी मोठ्या लक्ष्मी दर्शनाचा प्रभाव पडून काही उमेदवार विजयी होतात) कोणता उमेदवार आपल्या वॉर्डाचा विकास करू शकेल. आपल्या सुखःदुखात धावून येऊ शकेल याचा सारासार विचार मतदार करीत आहेत. अजून कोणालाही अधिकृतरित्या कोणताही पक्ष किंवा आघाडीची उमेदवारी जाहीर झालेली नाही. मात्र, काही चांगल्या उमेदवारांना लोकांच्या हृदयात आतपासूनच स्थान मिळाले आहे, हेही खरे आहे. आखीर यह पब्लिक है...सब जानती है...!

### लोणसीमला बखळ जागेवरून एकास मारहाण

अमळनेर : बखळ जागेवरून झालेल्या वादातून तिघांनी एकास बेदम मारहाण केली आहे. ही घटना बुधवार, दि. ८ रोजी तालुक्यातील लोणसीम येथे घडली होती.

पोलिसांनी सांगितले, की महेश अर्जुन पाटील यांनी रवींद्र रामदास पाटील यांच्याकडून २०१२ मध्ये बखळ जागा विकत घेतली होती. मात्र, त्यांचा पूत्र माझ्या वडिलांना मद्यपान करुन ही जागा त्यांनी बळकावल्याचे ग्रामस्थांना सांगत आहे, अशी माहिती महेश पाटील यांना मिळाली. महेश पाटील यांनी रवींद्र पाटील व त्यांचा मुलगा शुभम रवींद्र पाटील यांना याबाबत जाब विचारला. याचा राग आल्याने रवींद्र पाटील व शुभम पाटील यांनी महेश पाटील यांना लाकडी दांडक्याने मारहाण केली. तुषार रवींद्र पाटील याने लोखंडी रॉडने मारहाण केली. महेश पाटील उपचार घेऊन परतल्यानंतर मारवड पोलीस ठाण्यात त्यांनी फिर्याद दिली. तिघांविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हवालदार दिनेश पाटील तपास करत आहेत.




# डॉ. आर. सी. सरवदेंना राष्ट्रीय गुरुरत्न पुरस्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : धुळे शिक्षण संस्था संचलित एम. डी. पालेशा वाणिज्य, कला व विज्ञान महाविद्यालय व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे एक दिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद झाली. ही परिषद शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर रोजी पालेशा महाविद्यालय तथा राष्ट्रीय लोक चौकशी आयोग (नीती आयोग संलग्नित, दिल्ली) यांनी धुळे येथे आयोजीत केली होती. या परिषदेत प्रताप महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आर. सी. सरवदे यांना राष्ट्रीय गुरुरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी विजयकुमार बन्साली (स्टेट जनरल चेअरमन), सौ. मीना भोसले (अध्यक्ष, सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था,धुळे), प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले, आंतरराष्ट्रीय परिषदेचे समन्वयक डॉ. हेमंत जोशी, सह समन्वयक डॉ. चंद्रशेखर वाणी, खानदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. संदेश गुजराथी, कार्योपाध्यक्ष निरज अग्रवाल, ज्येष्ठ संचालक हरी भिका वाणी, डॉ. अनिल शिंदे, विनोद पाटील, योगेश मुंदडे, कल्याण पाटील, प्रदीप अग्रवाल, चिटणीस प्रा. पराग पाटील, डॉ. जयंत पटवर्धन, प्रा. ए. एम. जैन, डॉ. दिलीप भावसार, प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, प्राध्यापक प्रतिनिधी दिनेश भलकार, सिनेट सदस्य डॉ. धीरज वैष्णव, डॉ. संदीप नेरकर, डॉ. विजय तुंटे, उपप्राचार्य डॉ. कल्पना पाटील, डॉ. अशोक पाटील, डॉ. शशिकांत सोनवणे, डॉ. अमित पाटील, डॉ. मुकेश भोळे, डॉ. नलिनी पाटील, ग्रंथपाल दीपक पाटील, डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. माधव भुसनर, डॉ. प्रमोद चौधरी, डॉ. ज्ञानेश्वर मराठे, डॉ. रवी बाळसकर, प्रा. विजय साळुंखे, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. बालाजी कांबळे, डॉ. विलास गावित, डॉ. किरण गावित, प्रा. वृषाली वाकडे, प्रा. वैशाली राठोड, डॉ. वंदना भामरे, प्रा. पुष्पा पाटील, प्रा. शशिकांत जोशी, प्रा. नितेश कोचे, प्रा. रोहन गायकवाड, प्रा. अनिल झळके, प्रा. देवेंद्र तायडे, प्रा. प्रशांत ठाकूर, प्रा. जितेश संदानशिव, प्रा. सुनील पाटील, प्रा. भानुदास गुलाले, प्रा. बापू संदानशिव, कुलसचिव राकेश निळे, देवेंद्र कांबळे, अजय साटोटे, योगेश बोरसे, कमलाकर पाटील, जयदेव पाटील, साबीर शेख, संदीप सोनवणे, संदेश शर्मा, धनराज मोरे, उमाकांत ठाकूर आदींनी अभिनंदन केले आहे.






# महसूलच्या पथकाकडून वाळू वाहतुकीचे ट्रॅक्टर जप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील महसुलच्या पथकाने तालुक्यातील मौजे आर्डी-जवखेडे रस्त्यावर वाळू वाहतून करणारे दोन ट्रॅक्टर जप्त केले आहेत. तहसीलच्या आवारात हे ट्रॅक्टर जमा करण्यात आले आहेत. ही घटना शुक्रवार, दि. १० रोजी घडली होती. तालुक्यात सर्रासपणे वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक सुरू आहे. मात्र, महसूल कडून होत असलेल्या कारवाया या फक्त थातूरमातूर असतात अशी ओरड पर्यावरणप्रेमींकडून होतआहे. या पथकात मंडळ अधिकारी पी. एस. पाटील, महसूल अधिकारी संदीप माळी, एम. आर. पाटील, विक्रम कदम, जितेंद्र पाटील, विकेश भोई, अमोल चक्रे, आकाश गिरी, सुधीर पाटील, पवन शिंगारे यांचा समावेश होता. वाळू चोरावर शास्ती लावत फौजदारी कारवाईचे अधिकार स्थानिक अधिकाऱ्यांना आहेत. १७ जुलैच्या शासन निर्णयानुसार ही कारवाई करणे आवश्यक आहे. अनेक पकडलेली वाहने केवळ शास्ती लावून सोडून देण्यात येतात. शासन निर्णयाची अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा पर्यावरण प्रेमी करीत आहेत.

# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234




**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

**जाहिरात बुकिंगसाठी संपर्क**
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# देवाजवळच्या दिव्याचे रहस्य...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवाजवळ दिवा का लावावा? कधी लावावा? याला वैज्ञानिक आणि शास्त्रीय कारणे असल्याचे सांगितले जाते. दिवसाला एकूण ८ प्रहर असतात. यात दिवसाला ४ व रात्रीचे ४ चे प्रहर असतात. यात दिवा लावायची वेळ महत्त्वपूर्ण असते. मुख्यतः त्या सायंकाळ आणि कातरवेळ अशा दोन असतात. पण या दोघांमध्ये फरक असतो तो पुढीलप्रमाणे- दिवसाचा चौथा प्रहर हा सायंकाळ असतो. जो ४ ते ७ वाजेपर्यंत असतो. त्यानंतर पुढे प्रदोष चालू होतो. सूर्य अस्ताची वेळ आणि सूर्य पूर्ण अस्त झाल्यावर सायंकाळ व प्रदोष चालू होण्याची मधली वेळ हीच कातरवेळ असते. जी सध्या ६.४५ ते ७.३० आहे आणि हीच वेळ दिवा लावण्यासाठी योग्य सांगितली आहे. पूर्वजही म्हणायचे ७ च्या आत घरात. सकाळी सूर्योदयापूर्वी आणि सायंकाळी सूर्यास्तानंतर ४८ मिनिटांच्या (दोन घटिकांच्या) काळाला ' संधीकाल ', असे म्हणतात. संधीकाल हा वाईट शक्तींच्या आगमनाचा काळ. दिवे का लावावेत हे प्रथम लक्षात घ्यावे... दिवे लावणे म्हणजे अग्नीस आवाहन करणे. सूर्य मावळल्यानंतर वातावरणातील प्रकाश व ऊर्जा दोन्ही कमी होते. यामुळे जे जीवजंतू सूर्यप्रकाशात टिकू शकत नाहीत असे जीव वातावरणात लगेच पसरतात. शरीरात प्रवेश करू शकतात व स्वास्थ्य बिघडवू शकतात. वातावरणात सूक्ष्म जीव असतात. त्यांना आळा घालण्यासाठी ऊर्जेची आवश्यकता असते. सूर्य मावळल्यानंतर ती ऊर्जा सर्वत्र दिवे लावून मिळविता येते म्हणून दिवे लावावेत. तसेच प्रकाशाचीही कमतरता भरून निघते. ही वेळ अत्यंत महत्त्वपूर्ण. कारण बऱ्याचदा वाईट शक्तींचा त्रास हा तिन्हीसांजेच्या वेळी सर्वांत जास्त प्रमाणात होतो. अघोरी विद्येचे उपासक तिन्हीसांजेच्या वेळी वातावरणाच्या कक्षेत प्रवेश करणाऱ्या वाईट शक्तींना नियंत्रणात घेऊन त्यांच्याकडून वाईट कृत्ये करवून घेतात. त्यामुळे तिन्हीसांजेच्या वेळीच मोठ्या प्रमाणावर अपघात, हत्या (खून) होतात किंवा बलात्काराची कृत्ये घडून येतात. या काळाला ' कातरवेळ ' म्हणजेच ' त्रासदायक किंवा विनाशाची वेळ ', असे म्हणतात. तिन्हीसांजेच्या वेळी वातावरणात वाईट शक्तींचे प्राबल्य अधिक असते. त्यामुळे वायूमंडलातील या वाईट शक्ती मुलांचे मन आणि बुद्धी यांवर आक्रमण करण्याची शक्यता अधिक असते. वायूमंडलात कार्यरत असणाऱ्या वाईट शक्ती रात्रीच्या काळात मुलांच्या मनात भीती निर्माण करतात. तिन्हीसांजेच्या वेळी दिवा लावून ' शुभं करोति ' व संध्या प्रार्थना म्हटल्यामुळे देहाभोवती व घराभेवती संरक्षक-कवच निर्माण होऊन वाईट शक्तींपासून रक्षण होते. तसेच देवाच्या आशीर्वादामुळे देहात कार्यरत असणारी शक्तीची स्पंदने १२ तास सूर्योदयापर्यंत सूक्ष्मातून कार्यरत राहतात. मुलांच्या मनातील भीती दूर होऊन त्यांना देवाशी अनुसंधान साधता येते. तसेच मुलांमध्ये क्षात्रवृत्ती वाढण्यास सहाय्य होते.

## कुलदेवतांचा वास दिवा लावल्यावरच!

असे म्हटले जाते, की दिवा लावल्यावर कुलदेवता, ग्रामदेवता या राखणदारासोबत फेरफटका मारतात. ज्या घरात दिवाबत्ती लावली जाते तेथे त्या वास करतात. घरातील व्यक्तींना व घराला वाईट स्पंदनांपासून संरक्षण करतात. तसेच कातरवेळ होताच ईशान्य दिशेकडून लक्ष्मी घुबडावर बसून येते. अनेक रूप धारण करून जेथे दिवा लावणी होते त्या घरात प्रवेश करते. कातरवेळी घुबड दिसला, की समजून जायचे लक्ष्मी आजूबाजूला अदृश्य रूपाने वावरत आहे. तुळस आणि लक्ष्मी दोघी एकमेकांच्या सखी आहेत. त्या कातरवेळी एकमेकींशी गप्पा मारतात म्हणून कातरवेळी तुळशीजवळ दिवा लावला जातो. सायंकाळी ६.३० नंतर केव्हाही दिवा लावावा. दिवा लावल्यावर घरातील सुवासिनींनी दिवा लावला, की घराचे मुख्य दार उघडून हातात हळद-कुंकू घेऊन थांबावे. कुलदेवता, ग्रामदेवता, लक्ष्मीला घरात येण्यासाठी आमंत्रण द्यावे. उंबरठ्यावर हळद-कुंकू वहावे. देवाजवळ आणि तुळशीजवळ दिवा लावून देव अन् दिवा यांना नमस्कार करावा. हल्ली सगळेच कामात व्यस्त असल्याने सायंकाळी सगळे घरी येतात. त्यात दिवा करायची वेळ चुकते. अशावेळी आल्यावर हातपाय धुवून दिवा नक्कीच करावा. कारण जसे आई- वडील मुलांची वाट पाहतात, की मुले कधी घरी येतील. तीच वाट आपली कुलदेवता देखील पाहत असते. घरातून बाहेर पडल्यावर परत घरी येईपर्यंत आपली जबाबदारीही तीच घेत असते.

# रुद्राक्ष : माहिती, वैशिष्ट्ये आणि धारण विधान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रुद्राक्ष हे भगवान शिव यांचे प्रतीक मानले जाते. त्याला आध्यात्मिक आणि औषधी महत्त्व आहे. शिवपुराणानुसार रुद्राक्ष हे भगवान शिव यांच्या अश्रूंमधून निर्माण झाले आहे. यामुळे त्याला विशेष पवित्रता आणि शक्ती प्राप्त आहे. खाली रुद्राक्षाची वैशिष्ट्ये, प्रकार, गुणधर्म आणि धारण विधान याबाबत सविस्तर माहिती दिली आहे.

**रुद्राक्षाची वैशिष्ट्ये**

**१) जड आणि सतेज :** रुद्राक्ष वजनदार, चमकदार आणि सतेज असावा.
**२) स्पष्ट मुखे :** त्याची मुखे (रेखा) स्पष्ट आणि नैसर्गिक असावीत.
**३) शुभचिन्हे :** ॐ, शिवलिंग, स्वस्तिक यांसारखी शुभचिन्हे असलेला रुद्राक्ष श्रेष्ठ मानला जातो.
**४) आकार :** मेरुतंत्रानुसार, मोठ्यात मोठा रुद्राक्ष आणि लहानात लहान शालिग्राम उत्तम मानले जाते.
**५) जुन्या झाडाचा :** कवेत न मावणाऱ्या मोठ्या बुंध्याच्या, म्हणजेच जुन्या झाडाचा रुद्राक्ष अधिक प्रभावी असतो.
**६) उंचीवरील रुद्राक्ष :** समुद्रसपाटीपासून अधिक उंचीवर किंवा झाडाच्या वरच्या फांद्यांवरील रुद्राक्षाला सत्वगुण अधिक मिळतात. त्यामुळे ते अधिक शक्तिशाली असते.
**७) रंग :** पांढरा रुद्राक्ष सर्वोत्तम, त्यानंतर तांबडा, पिवळा आणि काळा रुद्राक्ष क्रमाने कनिष्ठ मानला जातो. पांढरा आणि पिवळा रुद्राक्ष दुर्मीळ असतो, तर तांबडा आणि काळा रुद्राक्ष सर्वत्र आढळतो.

**रुद्राक्षाचे प्रकार, देवता आणि गुणधर्म**

**१) एकमुखी :** अत्यंत दुर्मीळ, परमात्मा शिवाचे प्रतीक. षड्रिपूंवर (काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर) विजय मिळवतो. मनोकामना पूर्ण करतो आणि धारणकर्त्याला वैराग्याकडे नेतो.
**२) द्विमुखी :** अर्धनारीनटेश्वर स्वरूप, शिव-शक्तीचे प्रतीक. व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल, कुंडलिनी जागृती, वैवाहिक सौख्य, मनःशांती आणि प्रगतीसाठी उपयुक्त.
**३) त्रिमुखी :** अग्निदेवाचे प्रतीक. वाचासिद्धी, तहान-भूकेवर नियंत्रण आणि कुशाग्र बुद्धी प्रदान करतो.
**४) चतुर्मुखी :** ब्रह्मदेवाचे प्रतीक. वक्तृत्व आणि स्मरणशक्ती वाढवतो, धारणकर्त्याला उत्कृष्ट वक्ता बनवतो.
**५) पंचमुखी :** पंचानन शिवाचे प्रतीक, पंचमहाभूतांचा समावेश. मनःशांती, सर्व रुद्राक्षांचे गुणधर्म आणि सहज उपलब्धता यामुळे सर्वोत्तम, परंतु सामान्यपणे याकडे दुर्लक्ष केले जाते.
**६) षण्मुखी :** कार्तिकेय स्वरूप, माता पार्वती आणि लक्ष्मी यांचा आशीर्वाद. व्यापारी लोकांसाठी उपयुक्त, आर्थिक स्थैर्य प्रदान करतो.
**७) सप्तमुखी :** सप्तमातृका आणि अनंत नागाचे प्रतीक, माता सरस्वतीचा आशीर्वाद. दीर्घायुष्य, अपघात आणि रोगांपासून (उदा.-मस्तकशूळ, संधिवात, विषमज्वर) संरक्षण, सर्पदंशापासून रक्षा.
**८) अष्टमुखी :** गणेश आणि अष्टमातृकांचे प्रतीक, त्रिदेवांचा आशीर्वाद. कुंडलिनी जागृती, समयसूचकता आणि विविध कलांमध्ये नैपुण्य प्रदान करतो.
**९) नवमुखी :** भैरव आणि दुर्गेचे प्रतीक. दुख, दैन्य आणि दारिद्र्यापासून रक्षा करतो.
**१०) दशमुखी :** यमराज आणि अष्टदिक्पालांचे प्रतीक. तामसी शक्ती आणि अनिष्ट ग्रहांपासून संरक्षण.
**११) एकादशमुखी :** ११ रुद्र आणि इंद्राचे प्रतीक. अतिशय दुर्मीळ, धारणकर्त्याचा अल्पावधीत भाग्योदय करतो.
**१२) द्वादशमुखी :** महाविष्णू आणि १२ ज्योतिर्लिंगांचे प्रतीक. व्यक्तिमत्त्व तेजस्वी बनवतो. शत्रू आणि अपघातांपासून रक्षा करतो.
**१३) त्रयोदशमुखी :** कामदेव आणि इंद्राचे प्रतीक. श्राद्धात धारण केल्यास पितरांना सद्गती मिळते.
**१४) चतुर्दशमुखी :** हनुमानाचे प्रतीक. शेंडीत किंवा गळ्यात धारण केल्यास योगविद्या आणि नैपुण्य मिळते.
**१५) गौरीशंकर रुद्राक्ष :** नैसर्गिकरित्या जोडलेले दोन रुद्राक्ष, शिव-शक्तीचे प्रतीक. सुख-शांती प्रदान करते, सामान्यतः देवघरात ठेवले जाते.
**१६) त्रिजुटी रुद्राक्ष** : अतिशय दुर्मीळ, तीन रुद्राक्ष नैसर्गिकरित्या जोडलेले, ब्रह्मा-विष्णू-महेशाचे प्रतीक. धारणकर्त्याला सर्व सुख-सुविधा मिळतात.

**धारण विधान**

**पक्ष :** शुक्ल पक्षातील रविवार, सोमवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार.
**तिथी :** द्वितीया, पंचमी, सप्तमी, दशमी, त्रयोदशी, पौर्णिमा.
**नक्षत्र :** हस्त, रोहिणी, स्वाती, उत्तराफाल्गुनी, उत्तराषाढा, उत्तरा भाद्रपदा, श्रवण, धनिष्ठा.
**लग्न :** मेष, कर्क, तुला, मकर, कुंभ लग्न श्रेयस्कर.

**राशीनुसार रुद्राक्ष :**

**मेष :** त्रिमुखी, **वृषभ :** षण्मुखी, **मिथुन :** चतुर्मुखी, **कर्क :** द्विमुखी, **सिंह :** एकमुखी, द्वादशमुखी, **कन्या :** चतुर्मुखी, **तूळ :** षण्मुखी, **वृश्चिक :** त्रिमुखी, **धनू :** पंचमुखी, **मकर :** सप्तमुखी, **कुंभ :** सप्तमुखी, **मीन :** पंचमुखी. रुद्राक्ष हे आध्यात्मिक आणि मानसिक शांतीचे प्रतीक आहे. त्याचे प्रकार आणि गुणधर्म यामुळे व्यक्तीला जीवनात सकारात्मक बदल घडविता येतात. योग्य विधीने आणि श्रद्धेने धारण केल्यास रुद्राक्षाचे लाभ अधिक प्रभावी होतात, अशी मान्यता आहे.




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कुबेर मंत्र मराठीमध्ये ॐ श्रीं ह्रीं क्लीं श्रीं क्लीं वित्तेश्वराय नमः॥ हा आहे. जो संपत्ती, समृद्धी आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी जपला जातो. या मंत्राचा नियमित जप केल्याने व्यक्ती धनहानी टाळू शकते. व्यवसायात नफा मिळवू शकते आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतात.

**मंत्र आणि त्याचे फायदे :**
**कुबेर मंत्र :** ॐ श्रीं ह्रीं क्लीं श्रीं क्लीं वित्तेश्वराय नमः॥

**फायदे :** आर्थिक अडचणी दूर होतात. धन-समृद्धी घरात येते. व्यवसाय आणि नोकरीत नफा मिळतो. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतात. आर्थिक स्थितीत सुधारणा दिसून येते.

**मंत्र जपण्याची पद्धत :**
दररोज कुबेर मंत्राचा जप करावा. या मंत्राचा जप केल्याने व्यक्तीला आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक असलेले सर्व भाग्य मिळते. या मंत्रासोबत कुबेर देवाची पूजा केल्यास आणि त्यांच्या कृपेची प्रार्थना केल्यास तो प्रसन्न होतो.

**इतर संबंधित माहिती :**
कुबेर देव हे संपत्ती आणि वैभवाचे प्रतीक मानले जातात आणि त्यांना 'यक्षांचा राजा' व 'देवांचा खजिना' असेही म्हटले जाते. दिवाळीच्या दिवशी धनत्रयोदशीला देवी लक्ष्मीसोबत कुबेर यांची पूजा करणे शुभ मानले जाते. कुबेराची मूर्ती किंवा फोटो उत्तर दिशेला लावणे भाग्यकारक ठरते.

# सुपारीचे ज्योतिषीय महत्त्व आणि उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्र आणि परंपरेनुसार सुपारी ही सर्व देवी-देवतांना प्रिय आहे. तिचा वापर केल्याने कोणतीही समस्या सहजपणे दूर होऊ शकते. विशेष म्हणजे सुपारीच्या उपायांसाठी फारसा खर्च येत नाही. फक्त दोन ते पाच रुपयांत सुपारी खरेदी करून तुम्ही तुमच्या समस्यांवर उपाय करू शकता.

**काय करावे?**

**१) अडकलेली कामे पूर्ण करण्यासाठी :** एक लवंग आणि पूजेची सुपारी घेऊन श्री गणपतीची पूजा करा. यामुळे दीर्घकाळ keep अडकलेली कामे पूर्ण होण्यास मदत होते. हा उपाय अचूक मानला जातो.

**२) दैनंदिन उपाय :** घरातून बाहेर पडताना एक सुपारी आणि लवंग सोबत ठेवा. लवंग तोंडात चघळताना ' श्री गणेशाय नमः ' या मंत्राचा जप करा. घरी परतल्यावर सुपारी देवघरात किंवा तिजोरीत ठेवा. काही दिवसांतच अडकलेली कामे आपोआप पूर्ण होऊ लागतील.

**३) आर्थिक प्रगतीसाठी :** पूजेतील सुपारी ही सिद्ध वस्तू मानली जाते. शास्त्रानुसार सुपारीला गौरी-गणेशाचे स्वरूप मानले जाते. ही सुपारी व्यवस्थितपणे तिजोरीत ठेवल्यास लक्ष्मीमातेची कृपा प्राप्त होते आणि आर्थिक प्रगती लवकर होते, अशी मान्यता आहे.









अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

